I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 127-129
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतीय कृषि क्षेत्रांमधील महिला श्रमिकांची भूमिका - एक अध्ययन

**जी. के. जीभकाटे[1] व विनोद मन्साराम बडवाईक[2]**
वाणिज्य विभाग, डॉ. खत्री महाविद्यालय, चंद्रपूर
वाणिज्य विभाग, राष्ट्रपिता म. गाधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावली जिल्हा चंद्रपूर (म.रा.)
*Corresponding Author :- badwaik.viond@gmail.com

| Communicated : 18.01.2023 | Revision : 25.02.2023<br>Accepted : 25.03.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

भारत हा कृषिप्रधान देश असून आजही 70% जनता ही कृषीक्षेत्रावर निर्भर आहे. कृषि क्षेत्रामधून विविध उद्योगांना लागणारा कच्च्या मालाचा पुरवठा केला जातो. भारतातील ग्रामीण भाग हा पूर्णपणे शेतीवर आणि शेतमजुरीवरच आपली उपजीविका चालवित असतो. ग्रामीण भागामध्ये पुरुषाच्या तुलनेत महिला शेतीमध्ये अधिकांश प्रमाणात काम करताना दिसून येतात त्यामुळेच कृषिक्षेत्रांमध्ये महिला श्रमिकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या अनुषंगाने विचार करता स्त्री श्रमिकांच्या एकूणच समस्येचा तसेच त्यांच्या कृषि क्षेत्रांमधील भूमिकेचा यथायोग्य अध्ययन करण्याचा प्रयत्न या शोधप्रबंधामध्ये करण्यात आलेला आहे. सामान्यत: आर्थिक मोबदला घेऊन जो मजूर (स्त्री अथवा पुरुष) शेतावर काम करतो त्याला शेतमजूर असे म्हणतात. फक्त शेती व्यवसायाचे काम करणारेच नाही तर शेती व्यवसायाशी संबंधित इतर व्यवसायामध्ये कार्य करणाऱ्या व्यक्तीचा देखील समावेश शेतमजुरांमध्ये करण्यात येतो. शेतीमध्ये बि-बियाण्याची पेरणी करणे, निदन करणे, कपाशी वेचने, पिकाची कापणी करणे इत्यादी कामे स्त्री शेतमजूर योग्य प्रकारे करू शकते. तसेच स्त्री शेतमजुर ही आपल्या कामात हयगय करीत नाही त्यामुळे कृषिच्या एकूणच उत्पादनात स्त्री शेतमजुरांची भूमिकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ग्रामीण भागातील पुरुष कामाच्या शोधात शहरांमध्ये जातात त्यामुळे ग्रामीण स्त्रीवर कुटुंबाचा भार पडतो त्यामुळे त्या कुटुंबाला आधार म्हणून शेतमजुरी करून उपजीविका करतात. अशा स्त्रियांना संधी विस्तार सेवा आणि कृषि प्रशिक्षण देऊन भविष्यातील विकास धोरण ठरवणे आवश्यक आहे. अनेक विकसनशील देशांमध्ये सरासरी 43 टक्के महिला कृषिक्षेत्रामध्ये मजूरीचे काम करतात.

**बिजशब्द** :- स्त्री शेतमजूर कृषि श्रम, उत्पादकता, कृषीपूरक व्यवसाय, मजुरी दर

**प्रस्तावना :-**

भारत हा कृषिप्रधान देश असून आजही 70% जनता ही कृषीक्षेत्रावर निर्भर आहे. कृषि क्षेत्रामधून विविध उद्योगांना लागणारा कच्च्या मालाचा पुरवठा केला जातो. भारतातील ग्रामीण भाग हा पूर्णपणे शेतीवर आणि शेतमजुरीवरच आपली उपजीविका चालवित असतो. कृषिक्षेत्रांमध्ये महिला श्रमिकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सामान्यत: आर्थिक मोबदला घेऊन जो मजूर (स्त्री अथवा पुरुष) शेतावर काम करतो त्याला शेतमजूर असे म्हणतात. फक्त शेती व्यवसायाचे काम करणारेच नाही तर शेती व्यवसायाशी संबंधित इतर व्यवसायामध्ये कार्य करणाऱ्या व्यक्तीचा देखील समावेश शेतमजुरांमध्ये करण्यात येतो.

दुसऱ्या शेतमजूर चौकशी समितिच्या मतानुसार, 'शेतमजूर म्हणजे केवळ शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या व्यक्ती नसून त्याशिवाय शेतीशी निगडित असलेल्या पशुपालन, कुक्कुटपालन, मधमाशा पालन, दुग्ध व्यवसाय, बागायती इत्यादी व्यवसायामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला सुद्धा शेतमजूर असे म्हणतात.' स्त्री शेतमजूर ही आर्थिक मोबदला मिळण्याच्या उद्देशाने दुसऱ्यांच्या शेतावर काम करीत असते तिला स्वत:च्या मालकीची शेतजमीन नसते, म्हणजे अशा महिला भूमिहीन शेतमजूर असतात. महिला ह्या पुरुषाच्या तुलनेत अधिक प्रामाणिकपणे, काळजीपूर्वक आणि आत्मियतेने कोणतेही काम करतात. बहुतांश स्त्री शेतमजूराकडून पेरणी करणे, निंदन - खुरपन करणे, कपाशी

वेचणे, पिकाची कापणी करणे इत्यादी कार्य करून घेतल्या जातात.

ग्रामीण भागातील मोठे शेतकरी आणि जमीनदार आपल्या शेतामध्ये स्वतः काम न करता शेतमजूराकडून ते काम करून घेतात. ग्रामीण भागांमध्ये बहुतांश स्त्री शेतमजुरांना सहा महिन्यापेक्षा जास्त शेतीची कामे उपलब्ध असतात. भारतामध्ये जवळपास 28 टक्के शेती करणारे आणि 48 टक्के भूमिहीन स्त्री श्रमिक आहेत. विविध अध्ययनावरून असे लक्षात येते की भारतात कृषी क्षेत्रातील महिलांच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. ग्रामीण भागातील महिला आपले घर सांभाळून देखील शेतीच्या कामात मदत करतात. पेरणीच्या हंगामाच्या काळात तर महिला दिवसभरातील आठ-नऊ तास शेतीच्या कामात गुंतून असतात. शेती,पशुपालन आणि कृषिपूरक व्यवसायामध्ये देखील स्त्रीया काम करताना दिसून येतात. भारतातील ग्रामीण भागातील महिला ह्या शेळीपालन, कुक्कुटपालन आणि पशुपालन या शेतीपूरक व्यवसायांमध्ये हातभार लावण्यास मदत करतात. गरीबी कौटूंबिक जबाबदारी, पुरुषांचे कुटूंबाकडे लक्ष न देण्याची तसेच काम न करण्याची प्रवृत्ती यामुळे ग्रामीण भागातील स्त्री नकळत घराच्या बाहेर निघते आणि शेतमजूरीच्या कामात स्वतःला झोकून देते व आपल्या कुटुंबाला सांभाळते.

**स्त्री श्रमिक, मजुरी आणि कृषि श्रम :-**

कृषी श्रमीकांचे भूमिधारी शेतमजूर, भूमिहीन शेतमजूर, स्थायी शेतमजूर, अस्थायी शेतमजूर अवयस्क किंवा बाल शेतमजूर, प्रोढ शेतमजूर पुरुष आणि स्त्री शेतमजूर अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात येते. ग्रामीण क्षेत्रातील पुरुष हे शेतीची कामे न करता शहरांमध्ये काम करायला जातात त्यामुळे शेतीच्या कामाकरता मजुरांचा तुटवडा ग्रामीण भागात दिसून येतो. अशा परिस्थितीत गावातील मोठे शेतकरी, जमीनदार शेतीच्या कामाकरता पुरुष श्रमिक उपलब्ध होत नसल्यामुळे किंवा ते शेतीची कामे करण्यास नकार देत असल्यामुळे स्त्री श्रमिकांना प्राधान्य देतात. स्त्री श्रमिकांची पुरुषाच्या तुलनेत मजुरी कमी असते तसेच या स्त्रिया ह्या मन लावून आपले काम करतात हा दुहेरी लाभ शेतकऱ्यांना होतो. त्याचप्रमाणे स्त्रिया सुद्धा आपल्या कुटुंबाला थोडाफार हातभार व्हावा या उद्देशाने ती शेतीच्या कामात कमी मजुरी असली तरी स्वतःला गुंतवून घेत. भारताचे अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होत आहे त्यात शेतमजुराचा फार मोठा वाटा आहे आणि त्यामध्ये स्त्री शेतमजूरांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पिकांची पेरणी करण्यापासून पिकांची कापणी करण्यापर्यंतची सर्व कामे महिला शेतमजूर करीत असतात. कोट्यावधि लोकांची पोटाची भूक भागवण्यासाठी दिवस-रात्र शेतामध्ये राबून अन्नधान्याचे उत्पादन करणारे शेतमजूर मात्र स्वतः खुप हलाखीचे जीवन जगताना दिसून येतात. ग्रामीण भागातील स्त्री शेतमजुरांना वर्षातून पाच - सहा महिनेच शेतीमध्ये काम मिळत असते. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याकरता कोणते ना कोणते काम करावेच लागते त्यामुळे ते कृषी विकासाला हातभार लागेल अशी कामे करीत असतात. जसेः शेतीला बांध बांधणे, कालवे तयार करणे, शेतामध्ये तलाव तयार करणे, विहिरी बांधणे इत्यादी या कामामुळे शेतीला पाणीपुरवठ्याची योग्य अशी सोय उपलब्ध होते, जमिनीची सुपीकता वाढते आणि त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होते अशा सर्व कामांमध्ये स्त्री शेतमजूरांचा महत्वपूर्ण भूमिका असते.

**शेती पूरक व्यवसाय व मजुरी दर:-**

बहुसंख्य शेतमजूर हे परिस्थितीने गरीब आहेत. कृषी व्यवसायातील कमी मजुरी, कमी रोजगार यामुळे केवळ शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह ते करू शकत नाही. श्रमिकांना वर्षभर शेतीमध्ये काम मिळत नाही त्यामुळे ग्रामीण भागातील पुरुष कामाच्या शोधात शहरांमध्ये जातात तर स्त्रिया मात्र गावातच शेतीला पूरक असे कोणतेही

काम करतात. म्हणून बहुसंख्य शेतमजूर शेतीला पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन, किंवा पशुपालनाचा व्यवसाय करतात. प्रत्येक शेतमजूरांकडे बैल, गायी- म्हशी, शेळी-बकरी इत्यादी कोणते ना कोणते जनावर असते. ग्रामीण भागातील बहुसंख्य शेतमजूर पशुपालनाचा व्यवसाय करीत असतात. दिवसभर शेळ्या, गाई- म्हशी रानावनात किंवा जीकडे चारा मिळेल तिकडे राखायला घेऊन जाण्याचे काम त्या करतात. त्यांचे संगोपन करणे, गाई - म्हशीचे दूध काढणे, दही- दूध जवळच्या गावात किंवा शहरात विकायला घेऊन जाणे इत्यादी शेतीपूरक व्यवसाय ग्रामीण भागातील स्त्रीया करताना दिसून येतात. या शेतीपूरक व्यवसायातून फारसे उत्पन्न होत नसले तरी त्यापासून कुटुंबाला फार मोठा आधार होतो. शेतीपूरक व्यवसाय पासून बैल, शेणखत इत्यादीचा पुरवठा होतो तसेच समाजाला दूध, दही, मांस, अंडी यांचा पुरवठा होतो.

ग्रामीण भागात स्त्री शेतमजूराला मिळणाऱ्या मजुरीचा दर हा पुरुषाच्या तुलनेत कमी असतो हा एक प्रकारे स्त्री शेतमजूरावर अन्यायच आहे. ग्रामीण भागातील स्त्री शेतमजुरांचे मोठ्या प्रमाणात शोषण होतांना दिसून येते. कमी मजुरी दरामुळे जमीनदार किंवा शेतमालक चा फायदा होतो. वास्तविक पाहता समानतेच्या तत्त्वानुसार स्त्री शेतमजुरांना देखील पुरुषाच्या बरोबरीने मजुरी मिळायला पाहिजे, परंतु वास्तवात मात्र असे दिसून येत नाही. पुरुष आणि स्त्री शेतमजुरांच्या मजुरी दरातील तफावत दूर करण्यासाठी शासनाने तसेच समाजाने योग्य पाऊले उचलायला हवीत.

**निष्कर्ष:-**

कृषिक्षेत्रामध्ये महिला शेतमजूरांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे हे मान्य करावेच लागेल. पर´तू शेतमजुरी करून जीवन जगणाऱ्या महिलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मूलभूत उपायोजना करण्याकरता शासनाने योग्य ते नियोजन करायला पाहिजे. ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांना योग्य व समान मजूरी मिळेल याकरिता ग्रामपंचायत पातळीवर किंवा जिल्हा पातळीवर महिला शेतमजुर मजूरी कमिटीची स्थापना करण्यात यावी तसेच ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांचे जमीनदार किंवा मोठ्या शेतकऱ्याकडून होणारे आर्थिक तसेच कौटुंबिक शोषण थांबविणे करता योग्य यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे शेतमालावर आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी या शेतमजूर महिलांना अधिक प्रेरित करणे आवश्यक आहे. शेतमजूर महिलांना शेतीमध्ये उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध यंत्रांची तसेच नवनवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण निशुल्क उपलब्ध करून द्यावे त्यामुळे त्यांच्या कौशल्यात वाढ होईल. शेतीपूरक व्यवसायातून प्राप्त होणाऱ्या उत्पादनांच्या विक्री करता योग्य बाजारपेठ तसेच त्यां उत्पादनाला टिकवण्याकरता शीतगृहांची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. एकूणच महिला शेतमजूरांचा आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढविण्याकरता शासनाने तसेच समाजात देखील प्रोत्साहन घेऊन त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलवायला पाहिजे. कृषिमध्ये कितीही आधूनिक यंत्रे-तंत्रे आणले तरीही महिला शेतमजूरांच्या सहभागाशिवाय शेतीची कामे करणे अशक्यच आहे.

**संदर्भ :**

https://en.m.wikipedia.org/wiki/Women_in_agriculture_in_India

https://www.oxfamindia.org/women-empowerment-india-farmers

https://www.dhanuka.com/blogs/women-the-unsung-warriors-of-indian-agriculture

https://vikaspedia.in/agriculture/women-and-agriculture/role-of-women-in-agriculture-and-allied-fields-1

https://www.google.com/amp/s/m-hindi.indiawaterportal.org/content%3fslug=karsai-kasaetara-maen-mahailaaon-kai-sahabhaagaitaa&type=content-type-page&id=68190&amp=1